Reviews of Literature
Impact Factor : 1.4716 (UIF)
Volume 2 , Issue 5 / Dec 2014 ISSN:-2347-2723

# भारताच्या स्वातंत्र्ययुध्दात सशस्त्र क्रांतीकारी कार्यात स्त्रियांचे योगदान

**प्रा. बालाजी गंगावणे**
विभाग प्रमुख, इतिहास , माऊली महाविद्यालय, वडाळा, ता. उ. सोलापूर जि. सोलापूर.

**प्रस्तावना -**

भारताला इंग्रजाच्या गुलामगीरीतून मुक्त करण्यासाठी व भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी जी स्वतंत्र चळवळ निर्माण झाली. त्या हजारी देशभक्तांनी भाग घेवून आपले रक्त सांडून, आपल्या संसाराची होळी करुन, तुरुंगवास लाढी सहन करुन आपल्या प्राणांची आहुती देवून भारताला इंग्रजांच्या तावडीतून मुक्त केले. या कार्यात नेताजी सुभाष चंद्र बोस, स्वातंत्र्यवीर सावरकर, भगतसिंग, सुखदेव, राजगुरु महात्मा गांधी, लालालजपतराय, पंडीत नेहरु यासारख्या हजारो देशभक्तांची नावे घेता येतील. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात जसे वरीलप्रमाणे शुरविर पुरुषाने कार्य केले त्याच प्रकारचे कार्य स्वातंत्र्य युध्दात भारतीय स्त्रीयांनी सुध्दा केले आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात स्त्रिया ही मागे नव्हत्या. तर त्याच ही लढ्यात सक्रिय सहभाग होता. शेकडो महिलांनी या लढ्यात भाग घेतला होता. यातील काही महिलांनी सशस्त्र क्रांतीकार्यात सहभाग नोंदविला होता. त्यांचा थोडक्यात वृतांत सदर लेखात देण्याचा प्रयत्न करीत आहे.

**झाशीच्या राणी लक्ष्मीबाई -**

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात राणी लक्ष्मीबाईचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. इंग्रजांच्या अन्यायांनी धोरणाविरुध्द त्यांनी शस्त्र हाती घेतले. इंग्रजाबरोबर झालेल्या युध्दांत राणी लक्ष्मीबाईनी जे राणकौशल्य दाखविले. त्यांची सर ह्युरोज या ब्रिटीश सेनापतीने मुक्तकंठाने प्रशंसा केली. मेरी झाशी नही दुंगी अशी गर्जना करीत लक्ष्मीबाईने युध्द केले.

**बेगम हजरत महाल -**

हजरत महाल या आयोध्यांच्या नवाबाची पत्नी होत्या. आयोध्या जिंकण्यास आलेल्या इंग्रज फौजेशी बेगम महाल यांनी सशस्त्र लढा दिला.

**येसुवहिनी सावरबर (बाबाराव सावकारांच्या पत्नी) -**

स्वातंत्र्यवीर सावरकर सशस्त्र क्रांती कार्यात सहभागी झाल्यानंतर सावकारांचे बंधु बाबाराव सावरकर यांना जन्मठेपेची शिक्षा झाली व त्यांना अंदमानात पाठविण्यात आले. नाशिक खटल्यांच्या वेळी येसू वहिनींना फार त्रास सहन करावा लागला. त्यांचा संसार जप्त करण्यात आल्यामुळे त्या निराधार बनल्या त्यांना कोणीही मदत केली नाही. क्रांतीकार्यामध्ये भाग घेणा-या कुटुंबातील महिलामध्ये त्यांनी स्वदेशी व देशभक्तीचा प्रसार केला. त्यासाठी आत्मनिष्ठ युवती समाजाची स्थापना केली.

**श्रीमती दुर्गादेवी बोहरा -**

बोहरा या भगवंतीचरण यांच्या पत्नी होया. लालालजपतराय यांच्या मृत्युचा सूड घेण्यासाठी भगतसिंह, सुखदेव इ. केलेल्या सॉडस वधाच्या खटल्यात भगवंती चरण यांनाही आरोपी केले होत. परंतु ते अखेर पर्यंत इंग्रजांना सापडले नाहीत. भगतसिंग, सुखदेव यांना सोडविण्यासाठी क्रांतीकारकांनी बॉम्ब तयार केले होते. त्यांचे प्रात्यक्षिक करताना स्फोट होऊन त्यात भगवंती चरण यांचा अंत झाला. लाहोर कटाच्या खटल्यांचा निकाल लागला व त्यात भगतसिंह सुखदेव इ. फाशीची शिक्षा झाली. त्यांचा सूड घेण्यासाठी श्रीमती दुर्गादेवी बोहरा यांनी मुंबईला येऊन गो-या सार्जटवर गोळ्यास झाडल्या.

**विणा दास -**

विणा दास हे चितगावणी राहणारी. तिने क्रांतीकार्यात सहभाग घेतला होता. कोलकत्यांच्या संस्कृत कॉलेजचे प्राचार्य श्री वेणी माधव दास यांचीही कन्या होय. त्यांना वीसाव्या वर्षी पदवी मिळाली होती. पदवीदान समारंभाच्या दिवशी ६ फेब्रुवारी १९३२ रोजी कु. विणा दास यांनी बंगालचे गव्हर्नर मि. स्टॅन्ले जॅक्सन वर ६ गोळ्या झाडल्या.

**कल्पना दत्त -**

चितगावची कल्पना दत्त हिने अत्यंत धाडी व ऐतिहासिक कार्य केले आहे. इंग्रजांची शस्त्रास्त्रे, दारुगोळा व खजिना लुटण्याचा जो चितगाव कट क्रांतीकारांनी रचला होता. त्यात कल्पना दत्त सहभागी झाली व इंग्रजांची शस्त्रास्त्रे व दारुगोळा खजिना लुटला. नंतर क्रांतीकारांना पकडण्यात आले अनेक जणांना फाशी देण्यात आले. कल्पना दत्तला जन्मठेप व काळ्यापाण्यांची शिक्षा देण्यात आली.

**प्रिती लता बड्डेदार -**

प्रितीही बंगालमधील क्रांतीकारक होय. चितगाव कटाल ही तिचा सहभाग होता. इंग्रजाच्या क्लबमध्ये वेशांतर करुन जाऊन तिन अंधाधुंद गोळीबार केला. त्यात १३ इंग्रज अधिका-यांना गंभीर जखमी केले. इंग्रजांच्या हाती न लागता प्रितीलतेने विष घेऊन आत्महत्या करुन आपला प्राण भारत मातेसाठी अर्पण केला.

**लिलाताई पाटील -**

पत्नी सरकारच्या सेनानी पैकी खानदेशाचे डॉ. उत्तमराव गिरधर पाटील यांच्या लिलाताई या पत्नी. त्यांचे क्रांतीकार्य मोलाचे होते. त्यांनी १९४२ च्या कांतीत मार्शल लॉ तोडण्याचा पराक्रम केला. साडेसहावर्षाची जाचक तुरुंगवासाची शिक्षा, असाह्य दुखणे असतानाही त्यांनी येरवडा तुरुंगातून पलायन केले व क्रांतीकारकास वाहून घेतले.

**आझाद हिंद फौजेतील शूर महिला -**

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेतही अनेक शूर महिलांनी कार्य करुन भारतीय स्वातंत्र्य चळवळ गतिमान केली. कु. कै. लक्ष्मी स्वामीनाथन, मानवतीपाडे, जानकी दावर, श्रीमती शकुंतला गांधी, कु. बेला मुखर्जी , ले. प्रतिमा सेन, डी कल्याणी अम्मा, रमा मेहता अशा अनेक महिलांनी कार्य केले आहे. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात पुरुषाप्रमाणे महिलांचा सिंहाचा वाटा होता.

**संदर्भ -**

१) १८५८ चे स्वातंत्र्यसमर
२) स्वतंत्र्यसंग्रामाचे महाभारत - ग.प्र. प्रधान
३) कथा स्वातंत्र्याची - कुमार केतकर
४) आधुनिक भारत - शं.द. जावडेकर
५) क्रांतीपर्व - उत्तमराव पाटील
६) कै. लक्ष्मी व राणी झाशी रेजिमेंट - रोहिणी गवाणकर